Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views, reviews, cricket from across India

परदेशस्थ मराठीजनांना भेटणार ठाकरे

25 Jan 2009, 0305 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

सुकृत खांडेकर

येत्या २ ते ५ जुलै दरम्यान अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथे आयोजित करण्यात आलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १४ व्या अधिवेशनात परदेशस्थ मराठीजनांना राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व्हिडीओ कॉन्फरन्सने भेटणार आहेत.

गेल्यावर्षी झालेल्या गुजराती अधिवेशनात मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना निमंत्रित केले होते. पण अमेरिकने त्यांना व्हिसा नाकारल्याने मोदींनी व्हिडीओ कॉन्फरन्सने संवाद साधला होता. त्यावेळी उपस्थित असलेल्या ३० हजार गुजराती लोकांनी मोदी पडद्यावर येताच उभे राहून त्यांचे भाषण ऐकले होते. याच धर्तीवर भारताच्या पहिल्या महिला व मराठी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील आणि शिवसेनाप्रमुख ठाकरे यांनी अमेरिकेतील मराठी लोकांशी फिलाडेल्फियाच्या अधिवेशनात संवाद साधावा, अशी त्यांना विनंती करण्यात आली आहे. अधिवेशनास उपस्थित राहणाऱ्या जगभरातील मराठी लोकांना प्रतिभाताई व बाळासाहेब संदेश देतील व त्यांच्याकडून कोणत्या अपेक्षा आहेत हेही सांगतील, असे आयोजन समितीचे प्रमुख सदस्य किरण जोगळेकर यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'ला सांगितले.

बृन्हमहाराष्ट्र मंडळ, नॉर्थ अमेरिका या संस्थेला यंदा २५ वर्षे पूर्ण झाली असून अमेरिकेत ४७ मराठी मंडळे आहेत. दीडशेपासून पंधराशे कुटुंबांपर्यंत त्यांचे सदस्य आहेत. न्यू जर्सी मराठी विश्व मंडळ सर्वात मोठे आहे. फिलोडेल्फियापासून अमेरिकेतील १० प्रांत मोटारीने येण्याच्या अंतरावर असल्याने यंदाच्या अधिवेशनास उपस्थिती विक्रमी राहील, अशी अपेक्षा आहे. अधिवेशनाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री अशोक चव्हाण, शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांना निमंत्रित करण्यात आले असून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे प्रमुख पाहुणे आहेत.

' पन्नाशीतला महाराष्ट्र' या विषयावर उद्धव ठाकरे, राज ठाकरे, सुप्रिया सुळे यांना मुलाखतींसाठी निमंत्रण देण्यात आले आहे. 'जुळवू नाते मनाशी मनाचे' हे अधिवेशनाचे ब्रिदवाक्य आहे. महाराष्ट्रातून अधिवेशनासाठी येणाऱ्या लोकांसाठी प्रवास व व्हिसा व्यवस्थेसाठी राजा-राणी ट्रॅव्हल्स मदत करणार आहे.

या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी इथे क्लिक करा.

About Us | Advertise with Us | Careers @ TIL | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright © 2009 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768